**नियमित दरखास्त क्र. ०७/२०१९.**
**नथ्थु इसनाजी देवतळे (म.वा.) .वि. वामन शामजी भवरे**
**CNR No.- MHYA-1800-0928-2019.**

## निशाणी क्र. २६ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज निर्णीत ऋणको याने दिवाणी प्रक्रिया संहिता-१९०८, कलम ४७ नुसार दाखल केला आहे. निर्णीत ऋणको याचे कथन आहे की, नि.दि.दा. क्र. ३४/१९९९ प्रकरणी दि. २९/४/२००० रोजीच्या न्यायनिर्णयानुसार वादीने रक्कम रुपये ६,०००/- हे न्यानिर्णय तारखेपासून २ महिन्याच्या कालावधीमध्ये जमा करुन पुर्तता करणे आवश्यक होते. तथापि, वादीने तसे केले नाही. त्यामुळे, प्रस्तुत दरखास्त मुदतबाह्य आहे. तसेच, हुकूमनामा धारक यांनी नि.क्र.११ वर दि. १०/०२/२०२१ रोजी रक्कम रुपये ६,०००/- जमा करणेबाबत परवानगी मिळणेबाबत अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज हुकूमनामा धारक यांनी मागे घेतल्याने दि. १४/११/२०२२ रोजी निकाली केला आहे. त्यामुळे, हुकूमनामा धारक यास पुन्हा नव्याने अर्ज दाखल करता येणार नाही. सबब, प्रकरण खारीज करणेबाबत विनंती केली आहे.

२. हुकूमनामा धारक यांच्या वतीने नि.क्र. २७ वर म्हणणे दाखल केले आहे. हुकूमनामा धारक यांनी अर्जातील कथन नाकबूल केले आहे. पुढे कथन केले आहे की, ते पूर्वीपासून करार पूर्तता करण्यास तयार होते व आहे. नि.क्र. ११ वरील अर्ज दाखल केला, ही बाब हुकूमनामा धारक यांची करार पूर्तता करण्याची तयारी व इच्छा दर्शविते. सबब, नि.क्र. २६ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| २ | आदेश काय ? | **अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.** |

## :: कारणमिमांसा ::

**वादप्रश्न क्र.१ करीता :-**

५. प्रस्तुत प्रकरण नियमीत दि.दा.क्र. ३४/१९९९ मधील न्यायनिर्णयानुसार सदर दावा मंजूर करण्यात आला. त्यानंतर मा. जिल्हा न्यायालय, पांढरकवडा (केळापूर) यांचे कडील जुने नि.दि.अपिल क्र. ६९/२००० नविन दिवाणी अपिल क्र. १०७/२००२ मधील न्यायनिर्णय व हुकूमनाम्यानुसार या न्यायालयाचा न्यायनिर्णय व हुकूमनामा रद्द करण्यात आला. त्यानंतर, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ, नागपूर यांच्याकडील दुसरे अपिल क्र. ७५/२०१० मधील दि. ३१/०१/२०१९ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार मा. जिल्हा न्यायालय यांच्याकडील अपिलामधील आदेश रद्द करुन या न्यायालयातील न्यायनिर्णय व हुकूमनामा कायम करण्यात आला. सदर आदेशाविरुध्द निर्णीत ऋणको यांनी मा. सर्वाच्च न्यायालय, यांच्यासमोर दाखल केलेले प्रकरण नोंद डायरी क्र. ६३७७/२०२० हे निकाली करण्यात आले. त्यामुळे, या न्यायालयातील न्यायनिर्णय व हुकूमनामा कायम आहे. सदर हुकूमनाम्याचे फळ हुकूमनामा धारक यांना मिळणेकरिता त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. प्रकरणी विलंबाबाबत मुद्दा उपस्थित केला असून हुकूमनामा धारक हे दावा दाखल करेपासून आजपर्यंत सदर कराराची पूर्तता करण्यास प्रयत्नशिल आहेत. हुकूमनामा धारक यांनी नि.क्र. २१ वर रक्कम रु. ६,०००/- न्यायालयात जमा करण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज दाखल केला असून नि.क्र. २२ वर न्ययालयामार्फत खरेदी-खत नोंदवून मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. हुकूमनामा धारक यांची सदर वर्तणुक करारपूर्तता करण्यास त्यांची तयारी व इच्छा होती व आहे, ही बाब स्पष्ट करण्यास पुरेशी आहे. त्यामुळे, मी या मतास आलो आहे की, प्रस्तुत दरखास्त मुदतबाह्य नाही. प्रकरणी दुसरा मुद्दा म्हणजे नि.क्र. ११ वर दाखल अर्ज हुकूमनामा धारक यांनी मागे घेतला असला तरीही त्याचा निर्णय गुणदोषांवर झालेला नाही. त्यामुळे, हुकूमनामा धारक यांनी नव्याने नि.क्र. २१ व २२ वर दाखल केलेल्या अर्जास कायदेशिर बाधा येत नाही. हुकूमनामा धारक यांनी मुळ दावा दि. १/२/१९९४ रोजी दाखल केला होता व त्याच्या न्यायनिर्णयाचे फळ मिळवण्याकरिता हुकूमनामा धारक हे सुमारे ३० वर्षापासून प्रदिर्घ कालावधीकरिता प्रयत्न करीत आहे. त्यामुळे निर्णीत ऋणको यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या कथनांमध्ये तथ्य दिसून येत नाही. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :-**

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. प्रकरण सन

२०१९ मध्ये दाखल केले असून मुळ हुकूमनामा नि.दि.दा.क्र. ३४/१९९९ मधील न्यायनिर्णय नुसार आहे. त्यावरुन हुकूमनामा धारक हे सन १९९४ पासून विवादीत कराराची पूर्तता करण्याचे प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते. उलटपक्षी निर्णीत ऋणको हे एनकेन मार्गे प्रकरण प्रदिर्घ कालावधीकरिता प्रलंबित ठेवून हुकूमनामा धारक यांना न्यायनिर्णयातील आदेशाची अंमलबजावणी करण्यापासून वंचित ठेवत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अभिलेखावर दाखल कागदपत्रांचा तसेच वादाचा विचार करता, मी या मतास आलो आहे की, निर्णीत ऋणको याच्यावर विलंबाकरिता रक्कम रुपये २,०००/- खर्च बसवणे योग्य व न्यायाचे आहे. सबब, न्यायाच्यादृष्टीने, मी पुढील आदेश करीत आहे;

## <u>आदेश</u>

१) निर्णीत ऋणको याचा अर्ज निशाणी क्र. २६ खर्च रक्कम रु. २,०००/- बसवून नामंजूर करण्यात येतो.

२) निर्णीत ऋणको यांनी रक्कम रुपये २,०००/- खर्च हुकूमनामा धारक यांना पुढील तारखे दिवशी अगर पर्यंत द्यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2024.08.19 16:47:56 +0530

(अ.अ. उत्पात)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
घाटंजी, जि. यवतमाळ.

दिनांक :- १९/०८/२०२४.